# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## परिपत्रक क्र. ग्रंथालय विभाग/२०१६-२०१७

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठाअंतर्गत सर्व संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य / ग्रंथपाल यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ ग्रंथालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे उपलब्ध असलेले सर्व ई-डेटाबेसेस, ई-जर्नल्स, ई-बुक्स, विद्यापीठ संलग्नीत व इतर सर्व महाविद्यालयांना व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार वार्षिक वर्गणी रु.१०,०००/- (दहा हजार फक्त) भरुन रिमोट ॲक्सेस **(Remote Access)** देण्यात येत आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संशोधक / प्राध्यापकासाठी वार्षिक शूल्क रु.२००/- आकारण्यात येईल.

सदरील ॲक्सेस हा महाविद्यालयातील प्राध्यापकांना व ग्रंथालयांना देण्यात येईल, विद्यापीठ कार्यक्षेत्रा बाहेरील संशोधकासाठी वार्षिक शुल्क रु. २०००/- आणि प्राध्यापकासाठी रु. ४०००/- आकारले जाईल , वार्षिक वर्गणी ही **कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद** यांच्या नावे धनाकर्ष **(Demand Draft)** काढून विद्यापीठ ग्रंथपाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या नावे पाठवावा. त्या सोबत सर्व प्राध्यापकांची यादी ज्यामध्ये नांव, पद, मोबाईल नंबर, ई-मेल, आदी बाबींचा उल्लेख असावा. तसेच सदरील यादी ही एम.एस.एक्सेल (M.S. Excel) मध्ये ***librarian @bamu.ac.in*** या ई-मेलवर ही पाठवावी. त्यानंतर रिमोट ॲक्सेसच्या युजर आय.डी व पासवर्डची यादी महाविद्यालयाचे प्राचार्य व ग्रंथपाल यांच्या ई-मेल वर व पत्राद्वारे ही महाविद्यालयास पाठविण्यात येईल. यादीमध्ये जास्तीत जास्त ५० शिक्षकांचा समावेश करता येईल कृपया याची नोंद घ्यावी.

**विद्यापीठ प्रांगण )(**
**औरंगाबाद-४३१००४ )(**
**संदर्भ क्र. डॉ. बामुल/२०१६-२०१७/७२१ )(**
**दिनांक :- ३०/०६/२०१६ )(**

**विद्यापीठ ग्रंथपाल**

**या परिपत्रकाची प्रत महितीस्तवः-**

१) मा. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.
२) मा. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर, उस्मानाबाद.
३) सर्व प्राचार्य, संलग्नित महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.